महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३११ वे | दिनांक : ०८/११/२०२६ | वार : रविवार

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावरून तटकरे लक्ष्य : 'झारीतले शुक्राचार्य' म्हणत रुपाली ठोंबरे यांची टीका



मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याच्या चर्चेवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विलीनीकरणाबाबत केलेल्या विधानावरून रुपाली ठोमरे यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. दुसरीकडे, शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनीही तटकरे यांच्याबाबत गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर तटकरे यांना उपमुख्यमंत्री व्हायचे होते, अर्थ खाते स्वत:कडे घ्यायचे होते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ताबा मिळवायचा होता, असा दावा थोरवे यांनी केला आहे. त्यामुळे तटकरे यांच्याभोवती राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत अजित पवार आणि शरद पवार यांच्यात चर्चा झाली होती, असा दावा रुपाली ठोमरे यांनी केला आहे. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर या चर्चांबाबत सुनील तटकरे यांनी वेगळी भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला. जर दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत चर्चा झाली होती, तर सुरुवातीला तटकरे यांनी अशा कोणत्याही चर्चा झाल्या नसल्याचे का सांगितले, असा सवाल ठोमरे यांनी उपस्थित केला.

याबाबत बोलताना रुपाली ठोमरे म्हणाल्या की, अजित पवार आणि शरद पवार यांच्यात विलीनीकरणासंदर्भात चर्चा झाली होती. दोन्ही पक्ष एकत्र येण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असताना तटकरे यांनी अशी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. मात्र, आता नऊ महिन्यांनंतर त्यांची भूमिका बदलल्याचे दिसत आहे. त्यामुळे त्यांच्या या भूमिकेमागे नेमके कारण काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सुनील तटकरे यांच्या भूमिकेवर टीका करताना रुपाली ठोमरे यांनी आणखी एक गंभीर राजकीय आरोप केला. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेच्या वेळी तटकरे यांना केंद्रीय मंत्रीपदाबाबत कोणतीही शाश्वती नसावी. त्यामुळे त्यांनी त्यावेळी विलीनीकरणाच्या चर्चांना विरोध केला असावा, अशी शक्यता ठोमरे यांनी व्यक्त केली.

तसेच, सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांना आपल्या तालावर नाचवता येईल, असा विचार तटकरे यांनी केला असावा, असे विधानही त्यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्व आणि पक्षाच्या भवितव्यावरून सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ठोमरे यांच्या या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

पत्रकारांनी रुपाली ठोमरे यांना झारीतले शुक्राचार्य नेमके कोण आहेत, असा थेट प्रश्न विचारला. यामध्ये सुनील तटकरे यांचा उल्लेख आहे की प्रफुल्ल पटेल यांचा, अशी विचारणा करण्यात आली. त्यावर ठोमरे यांनी कोणताही संभ्रम न ठेवता सुनील तटकरे यांचेच नाव घेतले.

प्रफुल्ल पटेल यांच्याबाबत या प्रकरणात आपल्याला तशा प्रकारची भूमिका दिसून आलेली नाही. त्यामुळे विनाकारण त्यांचे नाव घेण्यात अर्थ नाही, असेही त्या म्हणाल्या. मात्र, सुनील तटकरे हेच विलीनीकरणाच्या प्रक्रियेतील अडथळा असल्याचा आरोप करत त्यांनी त्यांना 'झारीतले शुक्राचार्य' असे संबोधले.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनीही सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या जागेवरून हालचाली सुरू होत्या. या काळात सुनील तटकरे यांनी काही आमदारांशी संपर्क साधल्याचा दावा थोरवे यांनी केला आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांना गुप्तपणे फोन केले होते, असा आरोप महेंद्र थोरवे यांनी केला. त्यांना स्वत:ला उपमुख्यमंत्री व्हायचे होते. तसेच राज्याचे अर्थ खातेही स्वत:कडे घेण्याची त्यांची इच्छा होती. एवढेच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या ताब्यात घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता, असा खळबळजनक दावा थोरवे यांनी केला आहे.

थोरवे यांच्या या आरोपांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाबाबत नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाचे नेतृत्व, मंत्रिमंडळातील महत्त्वाची खाती आणि पक्ष संघटनेवरील नियंत्रण या मुद्द्यांवरून राजकीय समीकरणे बदलत असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर तटकरे यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

एकीकडे रुपाली ठोमरे यांनी विलीनीकरणाच्या चर्चांवरून सुनील तटकरे यांना लक्ष्य केले आहे, तर दुसरीकडे महेंद्र थोरवे यांनी त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दोन्ही नेत्यांच्या आरोपांमुळे सुनील तटकरे पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

विशेष म्हणजे, विलीनीकरणाच्या चर्चांबाबत तटकरे यांनी घेतलेली भूमिका आणि अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षातील नेतृत्वाबाबत झालेल्या कथित हालचाली यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. रुपाली ठोमरे आणि महेंद्र थोरवे यांनी केलेल्या आरोपांवर सुनील तटकरे काय उत्तर देतात, तसेच विलीनीकरणाबाबत त्यांची नेमकी भूमिका काय असणार, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्य केल्याच्या रागातून निर्घृण खून



कोल्हापूर / सदलगा : इचलकरंजी येथील प्रसिद्ध ज्योतिषी आणि पुरोहित मंदार अजित रानडे (वय ३५) यांच्या हत्येचे गूढ उकलण्यात कर्नाटकातील सदलगा पोलिसांना यश आले आहे. मुलीने केलेल्या आंतरजातीय प्रेमविवाहाला मदत केल्याच्या आणि त्या लग्नाचे पौरोहित्य केल्याच्या रागातून ही हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी संशयित आरोपी दीपक उर्फ बाबूसाहेब अण्णा मगदूम (वय ४५, रा. शिरदवाड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

घटनेची पार्श्वभूमी अशी की, ३१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवरील मानकापूर शिवारातील एका उसाच्या शेतात मंदार रानडे यांचा रक्ताच्या थारोळ्यात छिन्नविच्छिन्न झालेला मृतदेह शेतमजूर महिलांना आढळून आला होता.

पोलिस तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, आरोपी दीपक मगदूम याच्या १९ वर्षांच्या मुलीने १३ जानेवारी २०२६ रोजी शिवनाकवाडी येथील ओंकार कोंचे याच्याशी आंतरजातीय विवाह केला होता. मंदार रानडे यांनी या लग्नाचे पौरोहित्य केले होते आणि लग्न जुळवून आणण्यास मदत केली होती. या कारणामुळे समाजात आपली बदनामी झाली असा राग आरोपीच्या मनात होता. याच सूडातून त्याने रानडे यांच्या हत्येचा कट रचला.

हत्येच्या दिवशी आरोपीने एका अनोळखी फोन नंबरवरून रानडे यांच्याशी संपर्क साधला. एका नवीन लग्नाचे काम असल्याचे सांगून त्यांना मानकापूर येथील शिवारात बोलावून घेतले. रानडे घटनास्थळी पोहोचताच आरोपीने प्रथम त्यांच्या डोळ्यात मिरचीपूड फेकून त्यांना असहाय्य केले. त्यानंतर सोबत आणलेल्या धारदार शस्त्राने गळ्यावर सपासप वार करून त्यांची हत्या केली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बेळगाव जिल्हा पोलिस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तैनात करण्यात आले होते. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षक विश्वनाथ चौगुले आणि उपनिरीक्षक बसगौडा नेर्ली यांच्या पथकाने अवघ्या काही तासांत आरोपीला शिरदवाड येथून अटक केली. तपासादरम्यान हत्येसाठी वापरलेला रक्ताने माखलेला कोयता पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी केदार कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदलगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करत आहेत. निरपराध पुरोहिताच्या या निर्घृण हत्येमुळे परिसरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

- इचलकरंजी येथील प्रसिद्ध ज्योतिषी आणि पुरोहित मंदार रानडे (वय ३५) यांच्या हत्येचा कर्नाटकातील सदलगा पोलिसांकडून अवघ्या काही तासांत उलगडा.
- ३१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील मानकापूर शिवारातील उसाच्या शेतात मंदार रानडे यांचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला होता.
- आरोपी दीपक उर्फ बाबूसाहेब अण्णा मगदूम (वय ४५, रा. शिरदवाड) याने एका नव्या विवाहाचे काम असल्याचा बनावट कॉल करून मंदार रानडे यांना घटनास्थळी बोलावून घेतले.
- मंदार रानडे तेथे पोहोचताच आरोपीने आधी त्यांच्या डोळ्यात लाल मिरचीपूड फेकून असहाय्य केले आणि नंतर धारदार शस्त्राने गळ्यावर सपासप वार करून त्यांची हत्या केली.
- आरोपी दीपक मगदूम याच्या १९ वर्षांच्या मुलीने १३ जानेवारी २०२६ रोजी शिवनाकवाडी येथील तरुणाशी आंतरजातीय प्रेमविवाह केला होता.
- मंदार रानडे यांनी या आंतरजातीय लग्नाचे पौरोहित्य केले होते आणि ते जुळवून आणण्यास मदत केली होती, असा आरोपीचा समज होता.
- या विवाहामुळे समाजात आपली बदनामी झाली या तीव्र रागातून आणि सूडाच्या भावनेतून आरोपीने रानडे यांच्या हत्येचा कट रचला.
- बेळगाव जिल्हा पोलीस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली सदलगा पोलिसांनी विशेष तपास पथक स्थापन केले.
- तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने आरोपी दीपक मगदूम याला शिरदवाड परिसरातून ताब्यात घेतले.
- चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून पोलिसांनी हत्येसाठी वापरलेला रक्ताने माखलेला कोयता जप्त केला आहे.
- या प्रकरणी केदार कुलकर्णी यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील सखोल तपास करत आहेत.

दिवाळीनिमित्त सुट्टीची सूचना

दिवाळी सणानिमित्त दिनांक ८ ते ११ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत वृत्तपत्राचे प्रकाशन बंद राहील. वाचक, जाहिरातदार व सर्व हितचिंतकांनी याची नोंद घ्यावी.

आपणांस व आपल्या परिवारास दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! दीपोत्सव आपल्या जीवनात सुख, समृद्धी, आनंद आणि आरोग्य घेऊन येवो, हीच सदिच्छा!

- संपादक, व्यवस्थापन व वृत्तपत्र परिवार

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ नोव्हेंबर २०२६

श्रीकृष्ण महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकी : एक हात मदतीचा



गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) : येथील डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ .दामोदर काका पतंगे यांच्या 88 व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या उपस्थितीत त्यांच्या संकल्पनेतील शैक्षणिक वाटचाल योग्य रीतीने गतिमान करण्यासाठी आज महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकीचा परिघ आणखी विस्तारत नेऊन शेतकरी,शेतमजूर आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा शिधा, कपडे व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यापूर्वी शेतकऱ्यांसाठी व गरजूंच्या मदतीसाठी गुंजोटी गावातून एक मदत फेरी काढण्यात आली.कोरडा दुष्काळ,पाण्याचे दुर्भिक्ष्य ,हातातून गेलेले पीक अशा अवस्थेत हतबल झालेल्या शेतकऱ्यांसाठी व त्याचबरोबर शेतमजुरासाठी समाजाकडून आणि विविध संस्थेकडून कांहीतरे ठोस देणे गरजेचे होते.त्यामुळे केवळ आर्थिक मदतीपेक्षा प्रत्यक्ष दिवाळी साजरी करण्यासाठी फराळ,कपडे आणि शैक्षणिक साहित्याच्या मदतीचे आज संस्थेचे उपाध्यक्ष मा .प्रभाकर तात्या हिरवे, मा.रत्नाकरजी पतंगे,अभयकुमार हिरास,संचालक डॉ.सागर पतंगे ,राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले,प्रा. डॉ.मल्लमा आंबुसे,प्रा.डॉ.बालाजी कोनाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरित करण्यात आले.यावर्षी महाराष्ट्रातील सर्वदूर परिसरात , विशेषतः मराठवाडा विभागात पावसाचे प्रमाण अतिशय अल्प व कमी असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि शेतमजूर बांधव अडचणीत सापडले आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांची अवस्था तर अत्यंत वाईट आहे.अशा अडचणीच्या प्रसंगी समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे आद्य कर्तव्य आहे .हाच धागा पकडून आणि सामाजिक बांधिलकीचा विचार डोळ्यासमोर ठेवून,श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून "एक दीप मदतीचा शेतकरी व गरजूंसाठी" या उदात्त भावनेतून हा विशेष उपक्रम आज यशस्वीपणे राबविण्यात आला.यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड आणि कार्यालयीन अधीक्षक सिद्राम देशमुख यांनी विशेष पुढाकार घेत या कार्यक्रमाचे नियोजन केले. श्रीकृष्ण महाविद्यालय नेहमीच अशा उपक्रमात अग्रेसर राहत आले आहे.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच गुंजोटी गावातील, समाजातील दानशूर व्यक्ती, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



संत नामदेव राष्ट्रीय बालसाहित्य पुरस्काराचे २६ नोव्हेंबरला वितरण



छ. संभाजीनगर : हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनच्या वतीने यंदाचा राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्काराचे वितरण येत्या २६ नोव्हेंबर गुरुवार रोजी सायंकाळी पाच वाजता ऑनलाईन पद्धतीने वितरण करण्यात येणार आहे. असे संयोजक श्रीराम मारोतराव कऱ्हाळे (मराठी विभाग प्रमुख) शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाचे संयोजक यांनी पत्राद्वारे बाल साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांना कळविले आहे. या पुरस्काराचे स्वरूप आकर्षक स्मृती चिन्ह आणि सन्मानपत्र असे असून ते मान्यवरांच्या हस्ते हिंगोली येथे हा पुरस्कार ऑनलाइन पद्धतीने अय्युब पठाण यांना देण्यात येणार आहे. हा मानाचा राष्ट्रीय बाल साहित्य पुरस्कार श्री. पठाण यांना मिळणार असल्याने त्यांचे संपूर्ण साहित्य क्षेत्रातून हार्दिक अभिनंदन होत आहे.

मुहूर्ताचा बाजार!

जन्माला आलो,
मुहूर्त नव्हता!

मरण येईल,
मुहूर्त नसणार!

मग जगताना
हा मुहूर्ताचा तमाशा कशाला?

घर घ्यायचं — मुहूर्त!
गाडी घ्यायची — मुहूर्त!
लग्न करायचं — मुहूर्त!
दुकान टाकायचं — मुहूर्त!

अरे बाबा,
मुहूर्ताने घर उभं राहत नाही,
कष्टाने उभं राहतं!

ग्रह गाडी चालवत नाहीत,
स्टीअरिंग हातात घ्यावं लागतं!

तुझ्या भीतीवर
काहींची दुकानं चालतात.
तुझ्या अज्ञानावर
काहींचे महाल उभे राहतात.
तुला मुहूर्त विकतात,
आणि स्वतः मात्र
संधीचा मुहूर्त साधतात!

अरे,
वेळेला शुभ-अशुभ नसतं,
कर्माला दिशा असते!

पंचांग बाजूला ठेव,
मेंदू उघड!

ग्रहांना दोष देणं थांबव,
स्वतःची जबाबदारी स्वीकार!

मुहूर्ताच्या मागे धावू नकोस,
इतिहास घडवणारे
मुहूर्त पाहत बसत नाहीत!

डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार

अज्ञानाच्या अंधाराला

चला चला दादा भाऊ,
प्रकाशाचा दिवा लावू.
जिथे दिसेल अंधार,
दिवा घेऊनच जावू. १

दिवा ज्ञानाचा घेऊन,
अंधारात घाम गाळू
अज्ञानाच्या अंधाराला,
दिवा लावूनच जाळू. २

सुखासाठी समाजाच्या,
वात प्रकाशाची तेवू.
दारी आनंद नेऊन,
विकासाचे रूप देवू. ३

प्रकाशाच्या दिवसात,
असा दुष्काळ पडला.
हाल गुरांचे पाहून,
बाप हळूच रडला. ४

झळा दुष्काळाच्या पहा,
तेल वातीला मिळेना.
भोग नशिबाचे त्यांच्या,
आता कोणास कळेना. ५

चला पेटवूनी दिवा,
उजळूनी काढू रात.
प्रकाशाने अंधाराला,
पुन्हा पुन्हा देऊ मात. ६

दीप लावूनी ज्ञानाचा,
हातामध्ये हात घेऊ.
अक्षरांच्या संगतीने,
जोड हृदयाला देऊ. ७

जोडलेल्या हृदयाला,
ठेऊ जपून मनात.
अंधारात दडलेले,
लोक आणूया जनात. ८



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ नोव्हेंबर २०२६

उपेक्षित कृषी कन्येच्या दु:खभोगाचा जीवनपट : 'अरसड'

कादंबरी हा मराठी वाङ्मयातील एक महत्त्वपूर्ण आणि समृद्ध साहित्यप्रकार आहे. मानवी जीवनातील विविध अनुभव, भावभावना, संघर्ष, सामाजिक वास्तव, कौटुंबिक संबंध आणि बदलत्या परिस्थितीचे विस्तृत चित्रण कादंबरीतून केले जाते. घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा, स्थळ आणि काळ यांच्या परस्परसंबंधांतून मानवी जीवनाचा एक व्यापक पट कादंबरीत साकार होत असतो. व्यक्तीच्या जीवनातील सुख-दु:खांचे चित्रण करतानाच समाजातील विसंगती, विषमता आणि वास्तवाचे दर्शन घडविण्याची क्षमता या वाङ्मयप्रकारात असते. त्यामुळे कादंबरी केवळ मनोरंजनाचे साधन न राहता सामाजिक वास्तवाचे प्रभावी भाष्य करणारी साहित्यकृती ठरते. लोकवाङ्मय गृह, मुंबई येथून प्रकाशित झालेली व्यंकटेश सोळंके यांची 'अरसड' ही कादंबरी वाचनात आली. ही कादंबरी वाचून मन अस्वस्थ होते. ग्रामीण स्त्रीच्या वाट्याला आलेल्या व्यथा, वेदना, उपेक्षा आणि कौटुंबिक छळाचा दुर्लक्षित पट लेखकाने अत्यंत संवेदनशीलतेने मांडला आहे. स्त्रीच्या जगण्यातील संघर्ष, नातेसंबंधांमधील कृत्रिमता, सामाजिक परिस्थितीची गुंतागुंत आणि ग्रामीण जीवनातील विसंगती यांचे वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीत आढळते. 'अरसड' ही व्यक्तिकेंद्रित कादंबरी असून तिच्या कथानकाचा केंद्रबिंदू 'मनी' ही व्यक्तिरेखा आहे. तिच्या जीवनाभोवती कथानक फिरत राहते. तिच्या वाट्याला आलेला सासुरवास, मानसिक आणि कौटुंबिक छळ, उपेक्षा आणि दु:ख यांमुळे तिचे जीवन वेदनांनी व्यापून जाते. या कादंबरीचे वैशिष्ट्य असे की, येथे स्थळ आणि प्रदेश यांपेक्षा स्त्रीच्या दु:खाचे सार्वत्रिक स्वरूप अधिक प्रकर्षाने जाणवते. काळ बदलतो, समाज बदलतो; मात्र स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या काही वेदना आजही कायम असल्याची जाणीव ही कादंबरी करून देते. 'अरसड'मधील मनी ही व्यक्तिरेखा एका उपेक्षित कृषिकन्येच्या दु:खभोगाचे प्रतिनिधित्व करते. ग्रामीण कुटुंबव्यवस्था, पारंपरिक विचारसरणी, नातेसंबंधांतील अपेक्षा आणि सामाजिक परिस्थिती यांचा व्यक्तीच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो, हे तिच्या जीवनप्रवासातून स्पष्ट होते. माणसाचे जगणे त्याच्या सामाजिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमीशी जोडलेले असते. स्वत:च्या परिस्थितीतून बाहेर पडून सुखी आणि समृद्ध जीवन जगण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करीत असते; परंतु काही वेळा कौटुंबिक परिस्थिती, व्यक्तींची विक्षिप्त मनोवृत्ती आणि नात्यांमधील स्वार्थ यांमुळे व्यक्तीला अपेक्षित बदल घडवून आणता येत नाही. अशा परिस्थितीत दु:ख आणि संघर्ष हेच तिच्या जगण्याचे अविभाज्य भाग बनतात. व्यंकटेश सोळंके यांनी या वास्तवाचे चित्रण करताना ग्रामीण जीवनातील गुंतागुंत आणि मानवी स्वभावातील विसंगती यांचा वेध घेतला आहे. कादंबरीचे मुखपृष्ठ आघाडीचे चित्रकार मिलिंद कडणे यांनी साकारले आहे. मुखपृष्ठ अर्थपूर्ण असून कादंबरीच्या आशयाशी सुसंगत वाटते. त्यातून साहित्यकृतीच्या भावगर्भतेची जाणीव होते. लेखकाने कादंबरीची अर्पणपत्रिका आपल्या आईच्या स्मृतींना आणि तिच्या संघर्षमय जीवनाला समर्पित केली आहे. 'आयुष्यातील अनेक चढ-उतारांत कष्टाचे विश्व निर्माण करणारी आणि वेळप्रसंगी आईसोबतच बापाची भूमिका बजावणारी माझी माय रुक्मिणीबाई हिला कृतज्ञतापूर्वक...' या आशयातून लेखकाच्या मनातील मातृप्रेम, कृतज्ञता आणि आईच्या कष्टांविषयीचा आदर व्यक्त होतो. ही अर्पणपत्रिका केवळ वैयक्तिक भावना व्यक्त करणारी नाही, तर कष्टकरी स्त्रीच्या त्यागाचे आणि संघर्षाचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. 'अरसड' ही मनी नावाच्या उपेक्षित कृषिकन्येच्या दु:खभोगाची कहाणी आहे. सावत्रपणामुळे निर्माण झालेली दुराव्याची भावना, परित्यक्ता आईचे आयुष्य, आजोळच्या वातावरणातील उपेक्षा आणि वंचना या परिस्थितींचा परिणाम बालमनावर कसा होतो, याचेही चित्रण या कादंबरीत आढळते. रमनाच्या बालमनावर उमटणारे अनुभव आणि त्यातून निर्माण होणारी भावनिक घालमेल ही कथानकाला आणखी एक संवेदनशील परिमाण देतात. मनीच्या जीवनातील वेदनादायी प्रसंग, संघर्षाच्या काळात अनुभवास येणारे काही सुंदर क्षण आणि भविष्याविषयी निर्माण होणाऱ्या आशा यांमधून मानवी जीवनाचे विविध रंग व्यक्त होतात. दु:खाने व्यापलेल्या आयुष्यातही माणूस जगण्याचा प्रयत्न करतो, परिस्थितीशी झुंज देतो आणि सुखाच्या क्षणांचा शोध घेत राहतो. या जीवनानुभवांचे जिवंत चित्रण केल्यामुळे कादंबरीतील व्यक्तिरेखा वाचकांच्या मनात घर करतात. कादंबरीतील चक्रम, यादव, गंगा, सूर्याजी आणि मारुती यांसारख्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखकाने मानवी स्वभावातील विक्षिप्तपणा, स्वार्थी वृत्ती आणि नातेसंबंधांतील विसंगती चित्रित केली आहे. समाजातील अनेक नाती वरवर जिव्हाळ्याची आणि आपुलकीची वाटतात; मात्र प्रत्यक्ष जीवनात त्यांच्यामध्ये स्वार्थ, दांभिकपणा आणि भावनिक पोकळपणा दडलेला असतो. अशा नात्यांमुळे व्यक्तीच्या आयुष्यात निर्माण होणारा ताण आणि अस्वस्थता या व्यक्तिरेखांतून व्यक्त होते. माणसाच्या वागण्यातील विसंगती केवळ वैयक्तिक पातळीवर परिणाम करीत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर आणि विशेषत: स्त्रीच्या जगण्यावर त्याचे गंभीर परिणाम होतात. या वास्तवाचे चित्रण करताना लेखकाने कोणत्याही कृत्रिम आदर्शवादाचा आधार घेतलेला दिसत नाही. त्यामुळे व्यक्तिरेखा आणि प्रसंग अधिक वास्तववादी वाटतात. 'अरसड' कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती वाचकाला केवळ कथानकाच्या प्रवाहात गुंतवून ठेवत नाही, तर त्याला अंतर्मुख होण्यास भाग पाडते. कादंबरी संपते तेव्हा मनीच्या जीवनाची कहाणी अपूर्ण राहिल्याची भावना मनात निर्माण होते. पुढे तिचे काय झाले असेल? तिच्या आयुष्यात सुखाचे दिवस आले असतील का? तिच्या जीवनातील दु:खाचे मळभ दूर झाले असेल का? तिच्या मुलाने तिला आधार दिला असेल का? असे अनेक प्रश्न वाचकाच्या मनात निर्माण होतात. मनीच्या भवितव्याविषयीची ही अनिश्चितता वाचकाला सुन्न करते. तिच्या जीवनातील संघर्षाचा शेवट स्पष्टपणे समोर न आल्यामुळे तिची कहाणी एका व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही; ती समाजातील असंख्य उपेक्षित स्त्रियांच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करू लागते. वाचकाच्या मनात प्रश्न निर्माण करणे, त्याला अस्वस्थ करणे आणि सामाजिक वास्तवाचा नव्याने विचार करण्यास प्रवृत्त करणे, हे श्रेष्ठ साहित्यकृतीचे महत्त्वाचे बलस्थान असते. 'अरसड' ही कादंबरी हे सामर्थ्य प्रभावीपणे दाखवून देते. मनीच्या आयुष्याचे चित्रण करताना लेखकाने स्त्रीच्या वेदनांना केवळ भावनिक स्वरूप दिलेले नाही, तर त्या वेदनांच्या मागे असलेल्या सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थितीकडेही लक्ष वेधले आहे. स्त्रीच्या दु:खाकडे सहानुभूतीने पाहण्याबरोबरच तिच्या जगण्याला कारणीभूत ठरणाऱ्या परिस्थितीचा विचार करण्याची जाणीव ही कादंबरी निर्माण करते. 'अरसड' कादंबरीची भाषाशैली हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा, इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यंकटेश सोळंके यांची भाषा साधी, सरळ, सहज, अनलंकृत; परंतु अर्थवाही आणि रसाळ आहे. अलंकारांचा अनावश्यक वापर न करता जीवनानुभवांना कलात्मक पातळीवर व्यक्त करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. ग्रामीण जीवनातील अनुभव, लोकव्यवहार, नातेसंबंध आणि मानवी स्वभाव यांचे चित्रण करताना त्यांनी ग्रामीण बोलीभाषेचा प्रभावी उपयोग केला आहे. विशेषत: मराठवाड्यातील, नांदेड परिसरातील ग्रामीण बोलीचा बाज कादंबरीच्या भाषेला अस्सलपणा प्रदान करतो. या भाषेमुळे पात्रांचे बोलणे, त्यांची मानसिकता आणि त्यांच्या जगण्याची पद्धत अधिक सहजपणे वाचकांसमोर उभी राहते. कादंबरीत अनेक वाक्प्रचार, म्हणी आणि अनुभवातून आलेली सूचक विधाने आढळतात. 'धुळीचा रस्ता माणसाची धोरणं व वरातीची धूळवाडी करतो' (पृ. 9), 'घरात नाही दाणा म्हणे मला सायकल आणा' (पृ. 17), 'मावळायला मळा अन् रुबाबी बगळा' (पृ. 25), 'ज्याचं खावं मीठ त्याचं करावे नीट' (पृ. 27), 'मनीची एक एक रात्र वैऱ्याची जात होती' (पृ. 37), 'जवळच्याने केला पचका आणि जगण्याचा झाला इचका' (पृ. 40), 'ना धड ना गोड नुसती कारल्याची फोड' (पृ. 39), 'मान पान सोडला अन् घाणीत सडला' (पृ. 29) आणि 'पाण्यात राहून पाण्याची वैर करता येत नाही' (पृ. 23) ही त्याची काही उदाहरणे आहेत. 'मनीचे नशीब कोणत्या सटवीने गडबडीत लिहिले कोण जाणे' (पृ. 49), 'सात हत्तीचं बळ' (पृ. 100), 'बडा घर पोकळ वासा' (पृ. 120), 'न्याय नगं पण कुत्रं आवर' (पृ. 147), 'आयजीच्या नावावर बायजी उधार, घर मोठं फार... तिथे घरातली चोर अपार' (पृ. 168) आणि 'अडकलेला पाय आणि पुढे कुठं जाय' (पृ. 150) यांसारख्या वाक्प्रचारात्मक विधानांतून ग्रामीण जीवनातील अनुभव, उपरोध, सामाजिक विसंगती आणि मानवी स्वभावाचे दर्शन घडते. 'डोळ्याचे पाणी – सासूची वाणी – पाठीवरची लाथ – पोटाचा घात – आता हे जनमभर चालायचे देवा' (पृ. 35) या विधानातून स्त्रीच्या दु:खाची तीव्रता आणि तिच्या जगण्यातील असहायता प्रभावीपणे व्यक्त होते. या म्हणी आणि वाक्प्रचारांमुळे कथनाला स्थानिक संस्कृतीचा गंध प्राप्त होतो. त्याचबरोबर पात्रांच्या जीवनानुभवांना भाषिक अस्सलपणा लाभतो. 'अरसड' कादंबरीतील बोलीभाषेचा वापर हा केवळ भाषिक वैशिष्ट्यापुरता मर्यादित नाही. तो ग्रामीण समाजाच्या जगण्याशी आणि सांस्कृतिक जाणिवांशी जोडलेला आहे. 'सोयरिक्या', 'अवदसा', 'हवळ', 'लुडबुड', 'सडासारवण', 'कजाग सासू', 'ढाबळ', 'लाखोळी' यांसारख्या शब्दांतून ग्रामीण जीवनातील व्यवहार, परंपरा आणि सामाजिक संबंधांचे संदर्भ स्पष्ट होतात. अशा शब्दांचा वापर केल्यामुळे कथानकातील वातावरण अधिक जिवंत होते. प्रमाणभाषेच्या चौकटीत अडकून न राहता लेखकाने लोकभाषेतील शब्दसंपत्तीचा स्वीकार केला आहे. त्यामुळे कादंबरीला स्वतंत्र भाषिक ओळख प्राप्त होते. याशिवाय कादंबरीत हिंदी भाषेतील संवाद आणि शब्दांचाही वापर आढळतो. उदाहरणार्थ, 'दक्षिण देस से एक साधू आया है, दत्त दत्त नाम व भोजन दान चालू किया है। दक्षिण देस का साधू नंदेड मे आया है अब तक कोई नही किया, वो सबको खाना खिलाया है।' (पृ. 77) या संवादातून परिसरातील बहुभाषिक व्यवहाराचे दर्शन घडते. ग्रामीण समाजातील विविध भाषिक प्रभाव, लोकांचे परस्पर संबंध आणि त्यांच्या व्यवहारातील सहजता यांचा प्रत्यय अशा संवादांतून येतो. त्यामुळे कादंबरीचे सामाजिक आणि सांस्कृतिक विश्व अधिक व्यापक बनते.'अरसड' ही कादंबरी अध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करते. कौटुंबिक कलह, मानसिक अस्वस्थता, नात्यांमधील ताणतणाव आणि सामाजिक गुंतागुंत यांचे चित्रण करताना लेखकाने ग्रामीण जीवनातील वास्तवाचा वेध घेतला आहे. स्त्रीच्या दु:खाचे चित्रण, मानवी स्वभावातील विसंगती, ग्रामीण बोलीभाषेचा प्रभावी वापर आणि जीवनानुभवांना दिलेली कलात्मक अभिव्यक्ती या वैशिष्ट्यांमुळे ही कादंबरी वाचनीय ठरते. कादंबरीच्या आशयाचे समीक्षात्मक स्वरूपातील सार प्रा. डॉ. मथुताई सावंत यांनी मलपृष्ठावर मांडले आहे. त्यातून कादंबरीच्या आशयाला योग्य प्रकारे अधोरेखित करणारी पाठराखण झाल्याचे जाणवते.

एकूणच, व्यंकटेश सोळंके यांची 'अरसड' ही कादंबरी ग्रामीण स्त्रीच्या उपेक्षित जीवनाचे, तिच्या दु:खभोगाचे आणि संघर्षाचे वास्तवदर्शी चित्रण करणारी साहित्यकृती आहे. मनीच्या जीवनप्रवासातून लेखकाने ग्रामीण कुटुंबव्यवस्थेतील विसंगती, नात्यांमधील स्वार्थ, स्त्रीच्या वाट्याला येणारे दु:ख आणि सामाजिक परिस्थितीचे तिच्या जीवनावर होणारे परिणाम अधोरेखित केले आहेत. साधी, प्रवाही आणि ग्रामीण बोलीचा सशक्त आधार असलेली भाषा हे या कादंबरीचे महत्त्वाचे बलस्थान आहे. कादंबरी वाचून संपल्यानंतरही मनीच्या जीवनाविषयीचे प्रश्न वाचकाच्या मनात कायम राहतात. ही अस्वस्थता म्हणजेच या साहित्यकृतीच्या परिणामकारकतेची साक्ष होय. ग्रामीण स्त्रीच्या वेदनांना साहित्याच्या केंद्रस्थानी आणून तिच्या जगण्याचा विचार करण्यास प्रवृत्त करणारी 'अरसड' ही कादंबरी मराठी कादंबरीवाङ्मयात मोलाची भर घालणारी साहित्यकृती ठरते.

कादंबरी : अरसड
लेखक : व्यंकटेश सोळंके
प्रकाशक : लोकवाङ्मय गृह, मुंबई
पृष्ठ संख्या : 218मूल्य : ₹ 400/-

पुस्तक परिचय
डॉ. नारायण शिवशेट्टे, अर्जापूर

धनंजय पवार यांचे दु:खद निधन



लातूर (प्रा. नागसेन कांबळे) : महावितरण लातूरचे जनसंपर्क अधिकारी मा. धनंजयकुमार लक्ष्मण पवार यांचे शनिवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने आकस्मित निधन झाले. धनंजय पवार हे डॉ. बा.आ. मराठवाडा विद्यापीठातून बी. जे. आणि एम. जे. चे शिक्षण पूर्ण केले होते. मुळात पत्रकारितेची आवड असलेल्या धनंजय पवार यांनी नाट्यशास्त्रात आपली रुची वाढवून साहित्य, कला व संस्कृती यात आपल्या परीने रचनात्मक कार्य करत होते. त्यांनी अनेक वर्ष पांथस्थ नावाचे पक्षिकही चालवले. विद्यापीठातील युवक महोत्सवाचे त्यांचे नाते आजही कायम होते. त्यांनी प्रचंड प्रमाणात महाराष्ट्रात आपला मित्रपरिवार जोडला होता.सर्वांसाठी सतत मदत करणारा , जिव्हाळ्याने विचारपुस करून धाऊन जाणारा एक निस्वार्थ मित्र म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. त्यांच्या अशा अकाली जाण्याने सर्वजण हळहळ व्यक्त करत आहेत.

शेडची भिंत कोसळून कळंकी येथे शेतकऱ्याचा मृत्यू



कन्नड (अरुण थोरात) : कळंकी ता. कन्नड येथे शेतातील शेड ची भींत कोसळून संजय बाबुराव थोरात (वय ५०) यांचा मृत्यू झाल्याची घटना दि.०६ नोव्हेंबर रोजी सायं.०५:०० वा. घडली आहे.कळंकी येथील हिंगणमळी शिवारात गट क्र. ८१ मध्ये संजय बाबुराव थोरात यांचे शेत आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांसाठी चारा साठवून ठेवण्यासाठी ते कुटुंबीयांसह शेतात बांधलेल्या शेड मध्ये चाराकुट्टी भरीत मग्न असताना सायंकाळी ५:०० वाजेच्या सुमारास त्यांच्या अंगावर अचानक शेडची भींत कोसळली त्या खाली ते दबल्या गेले, कुटुंबीय व आसपास च्या शेतकऱ्यांनी त्यांना तात्काळ बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, गंभीर जखमी अवस्थेत त्यांना कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले, ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदना नंतर रात्री त्यांच्या वर कळंकी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेची कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे येथे नोंद केल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ऐन दिवाळीच्या धामधूमीत ही दुर्घटना घडल्यामुळे कळंकी गावावर शोककळा पसरली आहे. हालाखीच्या परिस्थिती मुळे शासकीय मदत देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ नोव्हेंबर २०२६

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वपूर्ण निर्णय

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : राज्यात दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या कक्षात स्वतंत्रपणे वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील नागरिकांसाठी आरोग्याविषयक सेवा प्रभावीपणे राबविता येणार आहेत. दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची यंत्रणा आता थेट तालुका स्तरापर्यंत नेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला. यासोबत जिल्हा व तालुकास्तरावर आरोग्यविषयक समन्वय समित्याही स्थापन होणार आहेत. हा तालुकास्तरावरील कक्ष केवळ खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ मधील दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या सर्व तालुक्यांत स्थापन करण्यात येणार आहे. या तालुक्यांतील नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात हा कक्ष सुरू होईल. जिल्हाधिकारी या कक्षात एका स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्याची कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती करतील. त्यांच्या मदतीला लिपिक व टंकलेखक असतील, तर आवश्यक सुविधा गटविकास अधिकाऱ्यांनी प्राधान्याने पुरवायच्या आहेत.आधी शासकीय योजना, मग निधीतून मदत रुग्णांना पात्रतेनुसार आधी आयुष्मान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना व धर्मादाय रुग्णालयांतून उपचार मिळवून दिले जातील. या योजनांसाठी अपात्र ठरणाऱ्या रुग्णांचे अर्ज संलग्न रुग्णालयांमार्फत ऑनलाइन प्रणालीवर मंजुरीसाठी पाठवले जातील. त्यासाठी कक्ष मार्गदर्शन करेल. कक्ष प्रमुखांनी उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि आशा सेविकांमार्फत गरजू रुग्णांचा शोध घ्यायचा असून, कोणताही रुग्ण उपचारांपासून वंचित राहणार नाही याची जबाबदारी या कक्षावर असेल.दोन स्तरांवर समित्या तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष स्थानिक आमदार, तर उपविभागीय अधिकारी (महसूल) सहअध्यक्ष असतील. तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, इंडियन मेडिकल असोसिएशन व केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशनचे प्रतिनिधी सदस्य असतील. कक्ष प्रमुख सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष पालकमंत्री, सहअध्यक्ष जिल्हाधिकारी, तर जिल्हा आरोग्य अधिकारी सदस्य सचिव असतील. तर, वैद्यकीय क्षेत्रातील दोन समाजसेवक अशासकीय सदस्य म्हणून या समितीचे काम पाहणार आहेत. आरोग्य तज्ञांची मदत घेणार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र मेडिकल परिषद, स्थानिक वैद्यकीय संघटना, खासगी रूग्णालय येथील आरोग्य तज्ञांची मदत घेणार आहेत. दुष्काळग्रस्त भागात आरोग्यशिबीरे आयोजित करून रूग्णांना औषधोपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. महिन्यातून दोन बैठका बंधनकारक दोन्ही समित्यांनी महिन्यातून किमान दोन बैठका घ्यायच्या आहेत. दुर्गम, मोठी लोकसंख्या असलेले आणि आरोग्य सुविधांची कमतरता असलेले भाग ओळखून तेथे प्राधान्याने उपाययोजना केल्या जातील. पिण्याच्या पाण्याशी व उष्णतेशी संबंधित आजारांचा आढावा, आरोग्य शिबिरे, फिरती वैद्यकीय पथके आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवांचे नियोजन समित्या करतील. महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक तसेच मधुमेह व रक्तदाबग्रस्तांकडे विशेष लक्ष दिले जाईल.अहवाल मंत्रालयाकडे तालुका कक्ष दैनंदिन कामकाजाचा व शिबिरांचा अहवाल जिल्हा कक्षाकडे देईल. जिल्हा कक्ष सर्व तालुक्यांचे अहवाल एकत्र करून मंत्रालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे सादर करेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीची यंत्रणा अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

तालुका स्तरावर कक्ष सुरू झाल्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्ण वेळेत निदर्शनास येतील आणि त्यांना योग्य उपचार व आर्थिक मदत मिळवून देणे शक्य होईल. आरोग्य योजनांचा लाभ आणि आवश्यकतेनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत यांचा समन्वय साधला जाईल. कोणताही गरजू रुग्ण आर्थिक अडचणीमुळे उपचारांपासून वंचित राहू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले



तेजोमय दिवाळी

आली आली दिवाळी, सोनेरी पहाट,
दिव्यांच्या प्रकाशाने सजली ही वाट.
उत्साह नवा अन् आनंदाची ही लाट,
आनंदाने सजला घराचा थाट.
उटण्याचा सुगंध अन् अभ्यंगस्नान,
अंगणातली रांगोळी वाढवते मान.
दारोदारी पणत्यांचा लखलखाट,
सगळीकडे पसरला प्रकाशाचा साज.

आकाशात शोभे रंगीबेरंगी कंदील,
मनातील अंधार दूर होईल.
सोन्यासारख्या क्षणांची उधळण करूया,
प्रकाशाने प्रत्येकाचे आयुष्य उजळूया.

लाडू, करंजी अन् चकलीचा चविष्ट फराळ,
नात्यांमध्ये वाढेल प्रेमाचा लळा.
हसऱ्या चेहऱ्यांनी उजळली घरे,
सगळीकडे पसरला आनंदाचा मेळा.

लक्ष्मीपूजन आणि गोड भाऊबीज,
समाधानाचे वाहो अंगणात बिज.
सदा राहो घरात समृद्धीची सावली,
तुम्हा सर्वांना जावो, आनंदाची दिवाळी!

प्रशांत काप्रतवार

प्राण्यांची दिवाळी

दिवाळीची सुरुवात झाली
गर्द हिरव्या वनात
आनंदाला उधान आले
सर्व प्राण्यांच्या मनात

हत्ती सर्वांना आंघोळ घाली
सोंडेने उडवून पाणी
माकड लावी उटणे
कोकिळा गाई मंगलगाणी

फराळासाठी जिराफदादा
खमंग चकली तळे
लांडगा खाई लपून लाडू
कुणालाच नाही कळे

कोल्ह्याला झाली मग
फटाके उडविण्याची घाई
चिमुकला भित्रा ससा
झाडामागून लपून पाही

गाढवाने लावली मग
सिंहांच्या गुहेजवळ भुईनळी
सिंहाची मोडली झोप
गाढव सैरावैरा पळी



- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ नोव्हेंबर २०२६

विद्यार्थी दिन : शिक्षण, समता आणि प्रबुद्ध समाजनिर्मितीचा संकल्प

दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्रात 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ विद्यार्थ्यांच्या आनंदाचा, उत्साहाचा किंवा शैक्षणिक उपक्रमांचा दिवस नसून शिक्षणाचे महत्त्व, ज्ञानाची शक्ती, सामाजिक समता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे सर्वांत प्रभावी साधन आहे. माणसाला विचार करण्याची क्षमता, योग्य-अयोग्य यांतील फरक ओळखण्याची समज, स्वतःचे अधिकार जाणून घेण्याचे भान आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य शिक्षणातून प्राप्त होते. त्यामुळे विद्यार्थी दिन हा प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या शैक्षणिक जबाबदारीची जाणीव करून देण्याबरोबरच समाजाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाची भूमिका अधोरेखित करणारा दिवस आहे.७ नोव्हेंबर या दिवसाला महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात विशेष महत्त्व आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये शाळेत प्रवेश घेतला होता. त्यांच्या शैक्षणिक जीवनातील या महत्त्वपूर्ण घटनेच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले असता शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानप्राप्तीची जपलेली जिद्द आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याची त्यांची भूमिका लक्षात येते. त्यांच्या जीवनातील हा प्रसंग विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक यशाची प्रेरणा देत नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि समाजाचे भविष्य बदलण्याचा आत्मविश्वासही देतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण सामाजिक विषमता, जातिभेद आणि अस्पृश्यतेच्या वातावरणात गेले. त्या काळात समाजातील काही घटकांना शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होत्या; परंतु वंचित आणि उपेक्षित समाजातील मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अशा प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत शिक्षणाची वाट चालणे हे मोठे आव्हान होते. मात्र ज्ञानप्राप्तीची तीव्र इच्छा, कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या बळावर बाबासाहेबांनी आपले शैक्षणिक जीवन घडविले. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळविण्याचे किंवा वैयक्तिक प्रतिष्ठा संपादन करण्याचे साधन मानले नाही, तर सामाजिक गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांपासून मुक्त होण्याचा मार्ग मानला. त्यांच्या जीवनातील हा विचार आजच्या विद्यार्थ्यांसाठीही तितकाच महत्त्वाचा आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ज्ञानाच्या बळावर माणूस स्वतःचे आयुष्य बदलू शकतो, हा विश्वास विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ होणे आवश्यक आहे.विद्यार्थी हा कोणत्याही राष्ट्राच्या भविष्याचा आधारस्तंभ असतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या विचारांवर, ज्ञानावर, कौशल्यांवर आणि मूल्यांवर उद्याच्या समाजाची रचना अवलंबून असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी तयार करणे पुरेसे नाही, तर त्यांना जबाबदार नागरिक, संवेदनशील व्यक्ती आणि विवेकी समाजघटक म्हणून घडविणे आवश्यक आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, आत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण झाली पाहिजे. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ माहिती मिळविणे नसून त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विवेकपूर्ण आचरणात रूपांतर करणे हा आहे. जेव्हा विद्यार्थी स्वतः विचार करू लागतो, प्रश्न विचारण्याचे धैर्य दाखवतो, पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढतो आणि समाजातील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहतो, तेव्हाच शिक्षणाचे खरे फलित दिसून येते.आजच्या काळात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती आणि संप्रेषणाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे ज्ञानप्राप्तीची साधने अधिक व्यापक झाली आहेत. पूर्वी ज्ञान मिळविण्यासाठी पुस्तके, ग्रंथालये आणि शिक्षक यांच्यावर प्रामुख्याने अवलंबून राहावे लागत होते; परंतु आज संगणक, भ्रमणध्वनी, आंतरजाल, डिजिटल ग्रंथालये आणि विविध शैक्षणिक व्यासपीठांमुळे जगभरातील ज्ञान विद्यार्थ्यांच्या हातात उपलब्ध झाले आहे. ऑनलाइन शिक्षण, आभासी वर्ग, डिजिटल अभ्याससाहित्य आणि मुक्त शैक्षणिक साधनांमुळे शिक्षणाच्या संधींचा विस्तार झाला आहे. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही ज्ञानाच्या नव्या स्रोतांपर्यंत पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना समान प्रमाणात मिळतो का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक ठिकाणी इंटरनेटची अनुपलब्धता, आर्थिक अडचणी, डिजिटल साधनांचा अभाव आणि तांत्रिक साक्षरतेची कमतरता यांमुळे विद्यार्थी शैक्षणिक संधींपासून वंचित राहतात. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचा विस्तार करताना सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार झाला असला, तरी शिक्षणाच्या समान संधींचे उद्दिष्ट अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक सुविधांमध्ये असलेली तफावत, गरीब कुटुंबांतील मुलांची आर्थिक परिस्थिती, मुलींच्या शिक्षणासमोरील सामाजिक अडथळे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि आदिवासी भागातील शाळांची उपलब्धता हे प्रश्न आजही महत्त्वाचे आहेत. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची इच्छा असूनही आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वाहतुकीच्या अडचणी आणि सामाजिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. काही विद्यार्थ्यांना बालमजुरी, बालविवाह, स्थलांतर आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी यांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे, ही जाणीव समाजात अधिक दृढ होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक आणि सामाजिक संघटनांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.शिक्षणातील सामाजिक समतेचा विचार करताना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. एखाद्या मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे जीवन बदलणे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाचा मार्ग खुला करणे होय. शिक्षित स्त्री स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक होते, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करते आणि कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेते. मुलींच्या शिक्षणामुळे बालआरोग्य, कुटुंबाचे आरोग्य, सामाजिक जागरूकता आणि आर्थिक विकासालाही चालना मिळते. तथापि, काही भागांत आजही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणाबाबत भेदभाव केला जातो. मुलींच्या सुरक्षिततेचे प्रश्न, लवकर विवाह, घरकामाची जबाबदारी आणि शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नसणे यांमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात. विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने प्रत्येक मुलाला आणि मुलीला समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचा सामाजिक संकल्प करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षक हा केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारा, जिज्ञासेला प्रोत्साहन देणारा आणि जीवनमूल्यांची रुजवण करणारा मार्गदर्शक असतो. शिक्षक विद्यार्थ्यांच्या क्षमतांची ओळख करून देतो, त्यांच्या अडचणी समजून घेतो आणि त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी प्रेरित करतो. प्रत्येक विद्यार्थी बुद्धिमत्ता, आवड, कौशल्य, शिकण्याची गती आणि सामाजिक पार्श्वभूमी या बाबतीत वेगळा असतो. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांकडून एकाच पद्धतीने आणि एकाच गतीने शिकण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतांचा आदर करून अध्यापनाच्या विविध पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्याला प्रोत्साहन देणे, चुका करण्याची संधी देणे आणि त्या चुकांमधून शिकण्यास मदत करणे ही आधुनिक शिक्षणपद्धतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.शिक्षणामध्ये पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी केवळ गुणांची अपेक्षा न ठेवता त्यांच्या आवडी, क्षमता आणि मानसिक स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा विद्यार्थ्यांवर परीक्षेत अव्वल येण्याचा, स्पर्धेत यश मिळविण्याचा किंवा विशिष्ट व्यावसायिक क्षेत्र निवडण्याचा अनावश्यक दबाव टाकला जातो. या दबावामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती, न्यूनगंड आणि मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते आणि यशाचे स्वरूपही वेगवेगळे असू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांची इतरांशी तुलना करण्याऐवजी त्यांच्या प्रगतीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. अपयश आले तरी ते आयुष्याचा शेवट नसून नव्याने प्रयत्न करण्याची संधी आहे, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे. पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत आणि त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन दिले पाहिजे.विद्यार्थ्यांच्या जीवनात वाचनसंस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुस्तके ही केवळ परीक्षेच्या अभ्यासाची साधने नसून ती माणसाला विचार करायला शिकविणारी, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक करणारी आणि अनुभवविश्व समृद्ध करणारी माध्यमे आहेत. नियमित वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपत्तीत भर पडते, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता वाढते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील पुस्तकांबरोबरच साहित्य, इतिहास, समाजशास्त्र, विज्ञान, चरित्रे, आत्मचरित्रे आणि विविध ज्ञानशाखांतील ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. विशेषतः समाजपरिवर्तनासाठी कार्य केलेल्या महापुरुषांचे जीवनचरित्र वाचल्यामुळे संघर्ष, जिद्द, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी यांची प्रेरणा मिळते. ग्रंथालये ही शैक्षणिक संस्थांची ज्ञानकेंद्रे आहेत. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात समृद्ध ग्रंथालय, वाचनालय आणि विद्यार्थ्यांना मुक्तपणे वाचन करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. भ्रमणध्वनी आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये सखोल वाचनाची आवड निर्माण करणे ही शिक्षक आणि पालकांसमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी संपादन करणे पुरेसे राहिलेले नाही. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, संघभावना, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर ही आधुनिक काळातील महत्त्वाची कौशल्ये आहेत. शिक्षणाचा संबंध रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींशी जोडताना विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेची समज देणे आवश्यक आहे. शेती, उद्योग, सेवा, पर्यटन, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, पर्यावरण आणि सामाजिक विकास अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःची आवड आणि क्षमता ओळखून व्यवसायाची दिशा निश्चित केली पाहिजे. त्याचबरोबर बदलत्या रोजगारव्यवस्थेनुसार नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी, हा उद्देश महत्त्वाचा असला तरी ते रोजगार निर्माण करणारे, समाजोपयोगी उपक्रम उभारणारे आणि आर्थिक विकासात योगदान देणारे बनले पाहिजेत.विद्यार्थी जीवन हे केवळ शैक्षणिक अभ्यासापुरते मर्यादित नसते. खेळ, कला, साहित्य, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक कार्य आणि पर्यावरण संवर्धन यांमधील सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सर्वांगीण आकार मिळतो. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना, नेतृत्व आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता विकसित होते. सांस्कृतिक उपक्रमांमुळे विविध भाषा, परंपरा आणि कलांविषयी आदर निर्माण होतो. सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील वास्तव परिस्थितीची जाणीव होते. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन, रक्तदानविषयक जनजागृती, ग्रामविकास आणि निरक्षरता निर्मूलन अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. ज्ञान आणि सामाजिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते.लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीकरणात विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे मतदार, प्रशासक, शिक्षक, संशोधक, उद्योजक आणि लोकप्रतिनिधी असणार आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि मानवी प्रतिष्ठा ही भारतीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. या मूल्यांचा आदर करणारा विद्यार्थीच जबाबदार नागरिक बनू शकतो. जात, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारे कोणताही भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा देण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे. समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहणेही तितकेच आवश्यक आहे. कोणतीही माहिती स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विविध दृष्टिकोन समजून घेणे आणि विवेकाने मत तयार करणे ही लोकशाही नागरिकत्वाची महत्त्वाची लक्षणे आहेत.सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणक्षेत्रात मोठे बदल घडत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना अभ्यासातील संकल्पना समजून घेणे, माहितीचे विश्लेषण करणे, भाषांतर करणे आणि विविध विषयांवरील ज्ञान मिळविणे अधिक सुलभ झाले आहे. मात्र तंत्रज्ञानाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विचारशक्तीला दुय्यम स्थान देता कामा नये. कृत्रिम बुद्धिमत्तेने दिलेली माहिती नेहमी अचूक असेलच असे नाही. त्यामुळे तिची पडताळणी करणे, संदर्भ तपासणे आणि स्वतःच्या आकलनानुसार निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. अभ्यासातील प्रामाणिकपणा, बौद्धिक संपदेचा आदर आणि माहितीच्या गोपनीयतेचे भान विद्यार्थ्यांनी जपले पाहिजे. तंत्रज्ञान हे शिक्षणाचे साधन आहे; ते शिक्षक, मानवी संवाद, अनुभव आणि स्वतंत्र विचार यांची जागा पूर्णपणे घेऊ शकत नाही. म्हणूनच तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर आणि मानवी मूल्यांचे जतन यांचा समतोल साधणे ही आजच्या विद्यार्थ्यांसमोरील महत्त्वाची गरज आहे.विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडेही शिक्षणव्यवस्थेने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अभ्यासाचा ताण, परीक्षेची भीती, रोजगाराबाबतची अनिश्चितता, सामाजिक तुलना आणि कौटुंबिक अपेक्षा यांमुळे अनेक विद्यार्थी मानसिक तणावाचा अनुभव घेतात. अशा वेळी त्यांना समजून घेणारे वातावरण, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन उपलब्ध असणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, मैदानी खेळ, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि सकारात्मक विचारसरणी यांचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याची सवय लावली पाहिजे. अपयश, अडचणी किंवा वैयक्तिक समस्या लपवून ठेवण्याऐवजी शिक्षक, पालक आणि विश्वासू व्यक्तींशी संवाद साधला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशाचे मोजमाप केवळ परीक्षेतील गुणांवर न करता त्यांच्या आत्मविश्वास, कौशल्ये, नैतिकता, आनंद आणि सामाजिक जाणीव यांच्या आधारेही केले पाहिजे.महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेचा विचार केला असता महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. स्त्रिया, शूद्र-अतिशूद्र, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे शिक्षणाचा अधिकार हा समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या चळवळीला बळ मिळाले. या समाजसुधारकांच्या कार्याचा वारसा जपत आजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील समता, सामाजिक न्याय आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. शिक्षण मिळाल्यानंतर केवळ स्वतःची प्रगती साधणे पुरेसे नसून समाजातील इतर घटकांच्या प्रगतीसाठीही योगदान देणे आवश्यक आहे. ज्ञानाचा उपयोग समाजातील विषमता कमी करण्यासाठी आणि दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी झाला पाहिजे.आज भारतासमोर लोकसंख्येच्या दृष्टीने तरुणाईची मोठी शक्ती उपलब्ध आहे. या तरुणाईला योग्य शिक्षण, कौशल्ये, संशोधनाची संधी आणि रोजगाराभिमुख वातावरण उपलब्ध करून दिल्यास देशाच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील संशोधन, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकास, सामाजिक समता, सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबन अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्पर्धेची भावना न वाढविता सहकार्य, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणेही आवश्यक आहे. देशाचा विकास हा केवळ आर्थिक समृद्धीवर अवलंबून नसून समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळण्यावरही अवलंबून आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या यशाबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.विद्यार्थी दिन साजरा करण्यामागील खरा हेतू केवळ औपचारिक कार्यक्रम आयोजित करणे किंवा भाषणे देणे हा नसावा. या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आस्था, ज्ञानाविषयी जिज्ञासा, परिश्रमांविषयी निष्ठा आणि सामाजिक परिवर्तनाविषयी बांधिलकी निर्माण झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळाप्रवेशाच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करताना शिक्षणापासून वंचित राहिलेल्या प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. या दिवसाचे औचित्य साधून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाचनप्रेरणा, निबंधलेखन, वक्तृत्व, चर्चासत्रे, ग्रंथप्रदर्शने आणि सामाजिक जाणीव जागृतीचे उपक्रम आयोजित केले पाहिजेत. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे व्यापक सामाजिक महत्त्व समजण्यास मदत होईल.शेवटी, शिक्षण हे व्यक्तीला केवळ साक्षर बनविणारे माध्यम नसून त्याला विवेकी, स्वाभिमानी, स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक बनविणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञान मिळविण्याबरोबरच त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमधील क्षमता ओळखून परिश्रम, सातत्य आणि प्रामाणिकपणाच्या बळावर आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा आणि सर्जनशीलता विकसित करावी, पालकांनी त्यांना प्रोत्साहन द्यावे आणि शासनाने सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून द्याव्यात. शिक्षणाची दारे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत खुली झाली, तरच समताधिष्ठित आणि प्रगत समाजाची निर्मिती शक्य होईल. ७ नोव्हेंबरचा विद्यार्थी दिन हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणारा आणि शिक्षणातून सामाजिक परिवर्तन घडविण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरला पाहिजे. कारण शिक्षणाने समृद्ध झालेला विद्यार्थीच उद्याच्या सक्षम, संवेदनशील आणि प्रगत भारताचा खरा शिल्पकार ठरू शकतो.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल –
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002